# ११. मातीची सावली

**स्टॅन्ली गोनसाल्विस** (१९५५) : प्रसिद्ध लेखक. 'मातीची सावली', 'मरणात खरोखर जग हसते' हे कथासंग्रह; 'मोझेसची काठी' हा लघुकथासंग्रह; 'रक्त नव्हे, प्रेम हवे' हा बालकथासंग्रह; 'बायबलमधील व्यक्ती', 'ह्याला जीवन ऐसे नाव' हे अनुवादित लेखन प्रसिद्ध. विविध नियतकालिके व दिवाळी अंकांतून सातत्याने कथा व ललित लेखन प्रसिद्ध.

वाडवळी या बोलीभाषेत लिहिलेली ही कथा आहे. मातीवर प्रेम करणाऱ्या फरसूच्या मनातील विविध भावनांचे वर्णन केले आहे. प्रस्तुत पाठ 'मातीची सावली' या कथासंग्रहातून घेतला आहे.

फरसू पाय ओढत पायरीवर येऊन बसला. आपली खरबरीत बोटं त्याने गुळगुळीत पायरीवरून फिरवली. मग दोन्ही पाय मुडपून गुडघ्यावर हात ठेवून तो आभाळाकडे बघत बसला.

''उठा जरा, आत जाऊन बसा,'' सुनेचा आवाज आला.

दरवाजाच्या चौकटीला धरून फरसू उठला. त्याच्या पायांची हाडं कडकडली. आतल्या खोलीत येऊन तो गुबगुबीत खुर्चीवर बसला. ह्या खुर्चीवर त्याला अवघडल्यासारखं वाटायचं. पाय वर घेऊन बसले, तरी सून डाफरायची. असं बसणं त्याला कधी ठाऊक नव्हतं. जुन्या घराच्या पायरीवर ऐसपैस बसायची त्याची तेवढीच जुनी सवय. दारातच चिंचेचं पुराणं झाड होतं. मडक्यातल्या पाण्यासारखा गारवा घरभर भरून राहायचा. आईच्या पदरासारखी चिंचेची सावली घरावर असायची. मंगलोरी कौलांच्या नळ्यांतून फुंकर मारावी तसं वारं घुमायचं.

फरसू पायरीवर बसायचा. वरून भिरभिरत येणारी फुलपाखरी पानं, झाडावर चढणाऱ्या खारी पाहणं हा त्याचा फावल्या वेळचा उद्योग होता.

रात्री जेवणखाण आटोपल्यावर तो आणि आबू उशिरापर्यंत चिंचेच्या मुळांवर बसायचे. पानांतून पाझरणारं चांदणं अंगावर घेत त्यांच्या गप्पा चालायच्या.. गुरंढोरं, वाडी, गावकीतली प्रकरणं.. असे अनेक विषय. कधीमधी इनूस मास्तर यायचे. पेपरात येणाऱ्या बातम्या ते सांगायचे. अमेरिकेत की कुठे घडणारी ती नवलं फरसू व आबू मोठ्या नवलाईने ऐकायचे.



चिंचेचा पाला खूप गोळा व्हायचा. फरसूच्या लेखी ते सारं खत होतं. पान न् पान जमा करून तो वाडीत टाकायचा. या एका झाडाने त्याच्या जमिनीला अशी काळी कसदार बनवली होती, की त्याला कधी खत विकत आणावं लागलं नाही.

पावसाळ्यात हिरवीगच्च झालेली त्याची भातं पाहून गावकरी मनोमन जळायचे. भाताचं झळाळणारं सोनं घरात येऊन पडलं, की वांगी, दुधी, कारली यांची लागवड व्हायची. फरसू व त्याची मंडळी पाठीचा कणा दुखेपर्यंत राबायची. त्याची विहीरसुद्धा तशीच पाणीदार होती. दुसऱ्या

वितापर्यंत दूध देणाऱ्या गाईसारखी. भर वैशाखातसुद्‌धा तिला भरपूर पाणी असायचं.

एका दुष्काळात गावातल्या साऱ्या विहिरी कोरड्याठाक पडल्या होत्या; पण फरसूच्या विहिरीतील पाण्याला काही अंत नव्हता. फरसू म्हणायचा,''बापजाद्यांची कमायी रे पोरांनो ! त्यांचीच पुण्यायी यी बावडी नय् नदी हय् नदी. कोणाया कामात खोडा घटला ते तुमश्या नशिबाई वाळू जाल्याशिवाय रेल का?.. मंग या दीड एकराया तुकड्यावर माज्या घरातले उंदीर तरी जगतील का?''

त्या दीड एकराच्या तुकड्यावर त्याने चार पोरं वाढवली. तीन पोरींची लग्न करून सासरी पाठवल्या. तिघींनाही गळे झाकतील एवढे दागिने करून घातले. मनू शेवटचा.

फरसू तिसरी-चौथीच्या पुढे गेला नव्हता. मनूला त्याने शिकवलं. कुठल्याशा इंग्रजी नावाच्या कंपनीत तो कामाला आहे. मातीत बोटं घालायला तो नाखूश असतो, हे फरसूला कधीच जाणवलं होतं; पण तो काहीच बोलायचा नाही. हातपाय चालतील तोवर ह्या मातीची चाकरी करायची, हे त्यानं व त्याच्या मंडळीनं कधीच ठरवलं होतं. पोटच्या पोरांइतक्याच प्रेमाने वाढवलेल्या झाडापानांना जीव जाईस्तोवर उघड्यावर टाकायचं नाही, हा त्यांचा निश्चय होता.

''बाबा, चला, जेवून घ्या.'' मनूचा आवाज ऐकून फरसू दचकला. तो उठून उभा राहिला. किंचित थकल्यागत वाटले त्याला... हं! पूर्वी असे पाय भरून यायचे नाहीत. झाडापानांना आधार देऊन वाढवताना हयात गेली. आपला आधार तर कधीच तुटून पडला.. आता स्वतःला सांभाळायला पाहिजे.. आपणच आपला आधार आता..

''काय सपनं बगत उबे रेतात, कोण जाणे ! अख्खा दिवस रांदीतच बसावं का आमी? '' फरसूच्या कानावर येईल इतकाच आवाज स्वयंपाकघरातून येत होता. स्वतःला सावरून तो जेवणाच्या टेबलावर येऊन बसला.

तिघंही मुकाट जेवत होते. ही खाणावळ फरसूच्या घशातून घास उतरू देत नव्हती. रोजचे हे मुके घास त्याच्या डोळ्यांत आसवं आणत होते.

पूर्वी जुन्या घराच्या त्या अंधाऱ्या पडवीत जेवणं व्हायची. मनूची आई प्रार्थना करायची.. 'आमचे बापा, तू सर्गात आहेस.....'

एकसुरात प्रार्थना झाल्यावर जेवण व्हायचं. मनूच्या आईची टकळी चालायची. मनू तर जेवता जेवता उठून नीना, सिबलशी मस्ती करायचा. तासभर जायचा जेवणाच्या गडबडीत... मनं रिती व्हायची घासागणिक पोटात माया उतरायची.. जेवण तरी काय असायचं.. एखादी भाजी, कधी डाळ, सुके बोंबील, भात आणि तांदळाच्या रोट्या, असंच काहीतरी..

पण, तरारून वाढलेल्या गुबगुबीत केळीचं अख्खं बन एका पाऊसवाऱ्यात जमिनीवर झोपावं, तसा आपला संसार होत्याचा नव्हता झाला. वाडीत खपताना पायाला तार की खिळा लागला आणि आठवडाभरातच बायको-कोसूची मेणवात विझून गेली! कोणाची नजर लागली, की पणजांची पुण्याई संपली? की गेल्या जन्मीच्या पापांचा घडा आता वाहत आहे? नाही, नाही.. हा मातीचाच शाप असणार. ज्या मातीने हा संसार फुलवला त्याच मातीला उजाड केलं आपण.. कारली-वांग्यासारखा तिचा बाजार मांडला. मनूने जमीन विकायला काढली व आपण बैलासारखी मान डोलवली. ''मनू , अरे पोरा, बोल रे कायतरी.. , '' फरसू न राहवून उमाळ्याने बोलून गेला, '' अरे , तू जमीन इकली मणून माज्या मनात कांय राग नय् का तुआ दुस्वास नय्.. आमसा जलम त्या मातीत गेल्ता मणून थोडं वायीट वाटते..''

''बाबा, जमीन इकली म्हणून आज ओ बंगला बांदता आला, नय् ते उबा जलम त्या गोठ्यात काडाला लागलोआ. आज माणसाहारकं घर मिळालंय, परमेसराये आभार माना.. नायतर तुमसं आपलं, माजी जमीन गेली, माजी जमीन गेली, चालूच.''

पाल अंगावर पडावी, तसे मनूचे शब्द ऐकून फरसूचे अंग थरारले. सूनबाई जेवायची थांबली होती. मनूच्या चेहऱ्यावर घर बांधल्याचा अभिमान काठोकाठ पसरला होता. फरसूला पोटात खड्डा पडल्यासारखं झालं. पुढ्यातली बशी सरकवून तो उठला. सूनबाई जेवू लागली. मनूही जेवू लागला.

फरसू खांदे पाडून, मान खाली घालून अंगणात आला.

बिल्डरने मनूला सुंदर, आटोपशीर बंगला बांधून दिला. त्याच्या समोरच त्याची भलीमोठी इमारत आकाराला येत होती.

फरसूला वाटलं, जमिनीवरनं ट्रॅक्टर फिरला, बागायत मातीला मिळाली, मोठाले खड्डे खणले गेले, भलंमोठं दगडविटांचं धूड तिच्यावर उभारलं गेलं, तेव्हा त्या मायला काय वाटलं असेल? आणि या मातीशी नाळ तुटली की माणूसपण तरी कसं राहणार? पाय मातीवर असतात, तोवरच माणूस माणूस असतो.. पोराने मातीशी नातं राखलं नाही, आता बापाशीही नातं सांगत नाही. सिमेंट, दगड, धोंड्यांशी का कधी माणसाचं नातं सांधलं जातं? मातीनंच घडवलंय ना आपणा सर्वांना? आणि शेवटी तिच्याच तर कुशीत विश्रांतीसाठी जायचं आहे.. तिलाच विकून आम्ही या गुळगुळीत, चकचकीत घरात राहायला आलो..

चंद्रप्रकाश सर्वत्र लखलखत होता. पूर्वी पावसासारखं चांदणं चिंचेतून ठिबकायचं. घरातील जुनीपुराणी वस्तू विकावी, तसं ते झाडही गेलं. आंबा, फणस, भेंडी, नेवर.. सारी जमीनदोस्त झाली.

मनू एकदा म्हणाला, '' यी झाडं मणजे नुस्ता कचरा.. उंदीर कवडे येतात घरात... आपल्या बंगल्यापुडं यी जंगली झाडं अजिबात शोभत नाय.. कापून मस्त गुलाब लावू..''

तेव्हा फरसू उत्तरला होता, ''पोरा, झाडं जंगली नसतात रे कवा ! आपण माणसंच जंगली.. कुराडी घेऊन झाडं कापणारी आपण माणसंच जंगली रे, मनू..''

फरसूच्या जन्माआधीची ती झाडं फरसूच्या डोळ्यांदेखत तोडली गेली. मनूने त्या ठिकाणी इंग्लिश गुलाबांची बाग फुलवली.

'' फरसू ऽऽ, फरसू अरे रातच्या पारा एकटाच बायेर काय करते?'' आबूचा आवाज ऐकून फरसू थोडा भानावर आला.

''आबू, बग पयली माजी बायको कोसू गेली.. मंगं जमीन गेली... घर सुद्धा पाडून टाकीलं न् शेवटी ती चिंच पण कापिली.. माजा एकटा पूत.. तो सुदं आथं माजा नय् रायला रे ... जेजूस आथं मानासुदं नेलं ते बरं होईल.. ''

''अरे, अया रडते काय फरसू ? मी.. तुजा दोस्त आबू हय्, इनूस मास्तर हय.. अं? न तुजा पोरगा, सूनबाय, पोरी, जावांय हत् नं? कोणी तुला टाकणार नय? आमचा फरसू खरंस डोकरा जाला आथं..'' आबू उसनं हसत म्हणाला.

'' आबू, यी माया रगताई माणसं.. पण जमीन इकली, पैशे आले न् ते बापाला इसरले.. आता माजं कोणी नय् रायलं! माजी जमीन गेली.. मी तिला ईकून टाकलं.. मनूनं कागद आणला, मी सयी केली.. मी बेईमानी केली.. माज्या मायला फशीलं.. ''

'' अरे येड्या, किती लोक जमिनी ईकितात. तू आपला नुस्ता रडत बवलाय.. बग, टोपलीभर पैसा मिळालाय मनूला.. आथं मातीत हात घालाशी गरज नय्.. सुखात खा मरेपरत.. ''

'' तो पैसा नय् रे आबू.. ते आमशा आजा, पणजाअं रगत हय्.. रगताअं नातं तुटे नय्.. रगताये शाप भोगाला लागतात.. ते शाप मीस भोगीन.. आथं पैसा नय् का सुख नय्.. जेजूस माफ कर रे ! ''

फरसूने हात जोडून आकाशाकडे पाहिले.

'' येड्या, फरसू, लोकं जमिनी ईकून मजा करतात. गाड्या घेतात.. बंगले बांदतात.. तुला आपलं

जलमभर ढोरहारकं खपाला पाये..''

" तू सुदं त्या बिल्डरहारका जाला रे, आबू!'' फरसूने आवाज चढवत त्याला फटकारले. मग त्याच्याकडे पाठ वळवून तो खालच्या आवाजात म्हणाला, " माती नयेल ते ढोराअ जीवन तरी काय कामाअ ? आबू, आमी लागले रे आथं वाटेल.. पण आमशी नातंपण.. त्यांना कायच नय् रेणार रे.. त्यांना पायाखालती जमीनच नय् रे..''

"पुढचं पुढे बगून घेतील ते,'' आबू त्याच्या खांद्यावर थोपटत म्हणाला, " आजकालशी पोरं खूप हुशार हायेत.. त्यांशे पाय जमिनीवर नाय.. यी पोरं बोटीवर जातात.. ईमानात जातात.. अरबस्तानात, इंग्लंड, अमेरिका कटे कटे गेल्यात पोरं आपली... चल तू, टाइम बग कवडा जाला.. जा, नीज..''

आबू निघून गेला. त्याची सावली मांजरीसारखी घुटमळत त्याच्या मागे गेली.

फरसू पाठमोऱ्या आबूकडे पाहतच राहिला. अचानक त्याची नजर डावीकडे वळली. त्याच्या दीड एकराच्या तुकड्यातून ती भलीमोठी इमारत कोंभासारखी वरवर येत होती. मंद चांदण्या प्रकाशात ते धूड अक्राळविक्राळ भासत होतं. इमारतीची काळी ठिप्पूस सावली झाडंझुडपं सपाट केलेल्या शेताला कवटाळत सुस्तावल्यासारखी अस्ताव्यस्त पसरली होती.

फरसूला वाटलं, ही आपल्या मातीची सावली आहे.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील ओळींतील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) मडक्यातल्या पाण्यासारखा गारवा. ..........................................

(आ) आईच्या पदरासारखी चिंचेची सावली. ..........................................

(इ) वरून भिरभिरत येणारी फुलपाखरी पाने. ..........................................

**प्र. २. खालील तक्ता पूर्ण करा.**

| घटना | परिणाम/प्रतिक्रिया |
|---|---|
| (१) फरसू खुर्चीवर पाय वर घेऊन बसतो. | |
| (२) मनूला फरसूने शिकवले. | |
| (३) वाडीत काम करताना कोसूच्या पायाला तार की खिळा लागला. | |
| (४) मनूने जमीन विकायला काढली. | |

**प्र. ३. आकृती पूर्ण करा.**


(अ) फरसूचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या कृती

(आ) पाठाच्या आधारे फरसूचे खालील मुद्द्यांच्या आधारे वर्णन करा.

छंद — मेहनत — **फरसू** — दु:ख — माणूसपण

## प्र. ४. ओघतक्ता तयार करा.

मनूची आई प्रार्थना करायची.



घासागणिक पोटात माया उतरायची.

## प्र. ५. खालील वाक्ये प्रमाणभाषेत लिहा.

(अ) ''आमचा जलम या मातीत गेला म्हणून थोडं वायीट वाटते.''

(आ) ''त्यांचीच पुण्यायी यी बावडी नय् नदी हय् नदी.''

## प्र. ६. खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधा व लिहा.

(अ) टकळी चालवणे–

(१) सूत कातणे. (२) सतत बोलणे. (३) वस्त्र विणणे.

(आ) नाळ तुटणे–

(१) मैत्री जमणे. (२) संबंध न राहणे. (३) संबंध जुळणे.

## प्र. ७. खालील अर्थांची वाक्ये पाठातून शोधून लिहा.

(अ) फरसूने आपल्या वडिलांचे ऋण व्यक्त केले –

(आ) फरसूचा संसार होत्याचा नव्हता झाला –

(इ) फरसूचे झाडांबाबतचे प्रेम –

## प्र. ८. स्वमत.

(अ) 'मातीशी नाळ तुटली, की माणूसपण तरी कसं राहणार?' या फरसूच्या विधानाशी तुम्ही सहमत असल्यास त्याची कारणे सोदाहरण लिहा.

(आ) पाठात व्यक्त झालेल्या फरसूच्या विचारांबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(इ) 'मातीची सावली' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत लिहा.

**उपक्रम :** (१) प्रस्तुत पाठाचे नाट्यरूपांतर करून वर्गात सादर करा.

(२) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' हे पुस्तक वाचा.

## भाषा सौंदर्य

आपली मराठी भाषा वाक्प्रचार, म्हणी व सुभाषिते यांनी समृद्ध आहे. शरीर अवयव, प्राणी, पक्षी, मानवी भावभावना, अन्न वा इतर अशा अनेक गोष्टींवरून आपल्याला वाक्प्रचार व म्हणी पाहायला मिळतात. खाली एक तक्ता दिला आहे. तक्त्यातील प्रत्येक रकान्यात दिलेल्या उदाहरणाप्रमाणे आणखी म्हणी व वाक्प्रचार शोधा व लिहा.

| शरीर अवयवावर आधारित | प्राणी व पक्षी यांवर आधारित | मानवी भावभावना | अन्नघटक | इतर घटक |
|---|---|---|---|---|
| चेहरा काळवंडणे. | पोटात कावळे ओरडणे. | जिवाची उलघाल होणे. | खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी. | दगडापेक्षा वीट मऊ. |

## भाषाभ्यास

तुमच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तुम्ही धडे वाचता, कविता वाचता. धडे आणि कविता म्हणजेच गद्य आणि पद्य यांच्या रचनेत फरक आहे, हे तुम्हांला माहीत आहे. हा फरक असतो मुख्यत: लयीचा. पद्य गाता येते किंवा लयीत वाचता येते. गद्याचे तसे नसते. कवितेमध्ये लय निर्माण कशी होते ? कुठल्या गोष्टीमुळे होते ? हे आज आपण बघणार आहोत. वृत्त, छंद यांसारख्या गोष्टींमुळे कवितेला लय मिळते. कवितेची लय समजण्यासाठी आपण त्या गोष्टींचा अभ्यास करणार आहोत. वृत्त किंवा छंद म्हणजे काय? लय निर्माण करण्यासाठी कवितेची जी विशिष्ट शब्दरचना केली जाते. ऱ्हस्व, दीर्घ स्वरांचा जो एक विशिष्ट क्रम वापरला जातो, त्याला 'वृत्त' म्हणतात. याचा अर्थ कविता एका विशिष्ट वृत्तामध्ये रचलेली असते, म्हणून ती आपल्याला लयीत म्हणता येते. गणितात जशा बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या संकल्पना येतात, तशा वृत्तविचारामध्ये काही संकल्पना महत्त्वाच्या आहेत. त्या संकल्पना आपण आधी समजून घेऊया.

| **व्याकरणातील संज्ञा** | लघू | गुरू |
|---|---|---|
| **अक्षरे** → | ऱ्हस्व अक्षरे | दीर्घ अक्षरे |
| **अक्षरे–स्वर** → | अ, इ, उ, ऋ | आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ |
| **स्वरयुक्त अक्षरे** → | क, कि, कु, कृ | का, की, कू, के, कै, को, कौ |
| **संकेत खूण** → | ∪ (अर्धचंद्र) | – (आडवी रेघ) |
| **मात्रा संकेत** → | १ मात्रा | २ मात्रा |

| उदा., | पसारा | काकडी | मदन | पाटण | वैशाली |
|---|---|---|---|---|---|
| **लघुगुरूक्रम** | ∪ – – | – ∪ – | ∪ ∪ ∪ | – ∪ ∪ | – – – |
| **मात्रासंख्या** | १ २ २ | २ १ २ | १ १ १ | २ १ १ | २ २ २ |
| | ५ | ५ | ३ | ४ | ६ |